महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

# भगवान परशुराम शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिपळूण

मु.पो. कान्हेपिंपळी, ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी ४१५ ६३९
WWW.DVET.GOV.IN / e-mail : iti.chiplun@dvet.gov.in

जा.क्र. औप्रसं/चिपळूण/भांडार/ 073 दिनांक :- 27/01/2025

संदर्भ :- 01. शासन निर्णय, वित्त विभाग, विअप्र 1008/ प्र.क्र.30/2013/विनिमय, भाग-2 दिनांक 17/04/2015 वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978. भाग-पहिला, उप विभाग - एक ते पाच मधील अ.क्र. 23 व नियम क्र. 146 तसेच अ.क्र. 48 व नियम क्र. 182

02. शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती 07/प्र.क्र.89/39 दिनांक 01/08/2011

03. मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रा.का. मुंबई-81 यांचे कार्यालयीन आदेश क्र. प्राकामुं/औप्रसं/भांडार/निर्लेख/2023/(का-4)/5836 दिनांक 12/12/2023

04. औप्रसं/चिप/भांडार/निर्लेखन/2025/ , दिनांक

**परिपत्रक :**

1. प्राचार्य, भगवान परशुराम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिपळूण जिल्हा रत्नागिरी या संस्थेतेतील निर्लेखन झालेल्या **हत्यारे, अवजारे,** उपकरणे, यंत्रसामुग्री, **संगणक** व आय.टी. उपकरणे **व इतर साधन सामुग्री** साहित्याची निविदा पध्दतीने एकत्रित लॉट स्वरूपात विक्री करण्यात येणार आहे.

2. **सदर विक्री प्रक्रीयेची कार्यपध्दती अटीं व शर्ती खालीलप्रमाणे रहातील :**

2.1. दिनांक 27.01.2025 पासून दिनांक 07.02.2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत निविदा प्राचार्य, भगवान परशुराम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिपळूण जिल्हा रत्नागिरी येथे स्विकारण्यात येतील. दिनांक 07.02.2025 सायंकाळी 5.00 नंतर कोणत्याही परिस्थितीत निविदा स्विकारण्यात येणार नाही.

2.2. विहित कालावधी व वेळेत एका निवीदादारांच्या कमाल दोन प्रतिनिधींना फक्त एकदाच साहित्याचा लॉट पहाणी करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

2.3. निविदा दोन लिफाफा पध्दतीने स्विकारण्यात येतील. त्यापैकी क्रमांक 1 च्या लिफाफ्याच्या पुढील भागावर स्वच्छ अक्षरात **"हत्यारे, अवजारे, उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक व आय.टी. उपकरणे व इतर साधन सामुग्री साहित्याची निविदा- आवश्यक दस्तऐवज"** व क्रमांक 02 च्या लिफाफ्याच्या पुढील बाजूस स्वच्छ अक्षरात **"हत्यारे, अवजारे, उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक** व आय.टी. **उपकरणे** व इतर **साधन सामुग्री साहित्याची निविदा- दर"** असे नमूद करण्यात यावे. तसेच दोन्ही लिफाफ्याच्या मागील बाजूस खरेदीदाराचे नाव, स्वाक्षरी, आस्थापनेचे नांव, संपूर्ण पत्ता, दूरभाष्य क्रमांक नमूद करणे आवश्यक राहील. दोन्ही लिफाफे सिलबंद स्वरूपातच स्विकारण्यात येतील.

2.4. इच्छूक खरेदीदारांकडून विहित नमुन्यातील व विहित स्वरूपात निविदाच स्विकारण्यात येतील. विहित नमुन्यात व स्वरूपात नसलेल्या निविदा नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार निम्नस्वाक्षरीकारांस राहील.

2.5. लिफाफा क्रमांक 01 **"हत्यारे, अवजारे,** उपकरणे, **यंत्रसामुग्री, संगणक** व आय.टी. **उपकरणे व इतर साधन सामुग्री निविदा- आवश्यक दस्तऐवज"** मध्ये खालीलप्रमाणे दस्तऐवज/प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात यावीत

2.5.1. पॅनकार्ड ची साक्षांकींत प्रत.

2.5.2. उद्योग आधार पत्राची साक्षांकींत प्रत.

2.5.3. जी.एस.टी. प्रमाणपत्राची साक्षांकींत प्रत

2.5.4. निवीदाकाराने निवीदा सादर करण्याच्या दिवसापर्यंत त्यांचा राज्य किंवा केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागाने किंवा महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासनाच्या अनुदानित संस्था यांनी कोणत्याही स्वरुपाच्या काळ्या यादी समावेश न झाल्याचे प्रमाणपत्र (मुळ प्रतीत संबंधित आस्थापनाच्या लेटर हेड वर)

2.6. लिफाफा क्रमांक 02 **हत्यारे, अवजारे, उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक** व आय.टी. **उपकरणे व इतर साधन सामुग्री साहित्याची निविदा- दर"** मध्ये खालीलप्रमाणे दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात यावीत :

2.6.1. **हत्यारे, अवजारे, उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक व आय.टी.** उपकरणे **व इतर साधन सामुग्री साहित्याची खरेदी किंमत विहित नुमना क्रमांक अ** मध्ये देण्यात यावी. सदर किंमतीमध्ये वस्तू व सेवा

Scanned with OKEN Scanner

कराचा समावेश करण्यात येवू नये. **शासकीय नियमानुसार** विक्री किंमत **वस्तू व सेवा करातून सूट मिळण्यासाठी निश्चित केलेल्या किमान** रकमे **पेक्षा जास्त** असल्यास **विक्री किंमतीच्या 2% इतका वस्तू व सेवा कर लागू राहील.**

2.7. लिफाफा क्रमांक 01 मध्ये अ.क्र. 2.4 मध्ये नमूद केलेली उपलब्ध कागदपत्रांपैकी सर्व दस्तऐवज/प्रमाणपत्रे नियमाधीन असल्यास खरेदीदारास पात्र घोषित करण्यात येईल. अन्यथा खरेदीदारास अपात्र घोषित करण्यात येईल. लिफाफा क्रमांक 01 मधील उपलब्ध कागदपत्रांवरून पात्र घोषित केलेल्या पात्र खरेदीदरांनी सादर केलेले लिफाफा क्रमांक 02 उघडण्यांत येतील. अपात्र खरेदीदारांचे लिफाफा क्रमांक 02 कोणत्याही परिस्थितीत उघडण्यांत येणार नाहीत. तसेच अपात्र खरेदीदारांनी प्राचार्य कक्षातून तात्काळ बाहेर पडावे. उगाच विक्री संदर्भातील पुढील कार्यवाहीमध्ये दखल दिल्यास अथवा नियमबाहय वर्तन केल्यास अथवा पुढील कार्यवाहीमध्ये अडथळा आणल्यास शासकीय कामकाजामध्ये अडथळा आणण्याबाबत त्यांच्यावर शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

2.8. **किमान तीन पात्र निवीदादारांच्या निविदा प्राप्त झाल्यास निविदा प्रक्रीया पुढे चालू ठेवण्यात येवून, लिफाफा क्रमांक 2 उघडण्यांत येईल. अन्यथा निवीदा प्रक्रीया संस्थगित ठेवण्यात येईल.**

2.9. ज्या निविदादारांने साहित्याचा खरेदी दर जास्त नमूद केलेला असेल अशा पात्र खरेदीदारास सदरहू साहित्याची विक्री केली जाईल. अशा खरेदीदाराने निविदा उघडण्याच्या दिनांकापासून 02 दिवसांत खरेदीची संपूर्ण रक्कम संस्थेस NEFT/Bank Draft/cheque द्वारे एकरकमी अदा करणे बंधनकारक राहील. धनादेश/धनाकर्ष द्वारे रक्कम अदा केल्यास धनादेशाची रक्कम संस्थेच्या खाती जमा झाल्यावरच साहित्य खरेदीदाऱ्याच्या ताब्यात देण्यात येईल. तसेच रक्कम अदा केल्यानंतर 04 कार्यालयीन दिवसांत साहित्य संस्थेतून घेऊन जाणे क्रमप्राप्त राहील.

2.10. साहित्य संस्थेतून आहे त्या स्थितीत स्वखर्चाने खरेदीदाराने कार्यालयीन वेळेत घेऊन जाणे आवश्यक राहील.

2.11. दरपत्रक उघडण्याचे ठिकाण प्राचार्य यांचे कक्ष, भगवान परशुराम शासकिय औ.प्र. संस्था, चिपळूण, कान्हे. ता. चिपळूण जिल्हा रत्नागिरी राहील.

2.12. निवीदाकार किंवा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी यांनी निविदा उघडण्याच्या वेळी 15 मिनिटे आगोदर विहित स्थळी उपस्थित रहाणे आवश्यक राहील. उशिरा येणाऱ्या अथवा विहीत वेळेत उपस्थित न रहाणाऱ्या खरेदीदारास किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींच्या कोणत्याही लेखी अथवा मौखिक निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही अथवा त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

2.11 निविदा उघडण्याची प्रक्रिया दृकश्राव्य पध्दतीने नोंदली जाणार आहे. त्याकरीता कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असणार नाही.

2.12 साहित्याच्या आधारभूत/वाजवी किंमतीपेक्षा कमी खरेदी दर आल्यास निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा सर्वस्वी अधिकार निम्नस्वाक्षरीकारांस राहील.

2.13 संस्थेतून साहित्य ताब्यात घेताना संस्थेच्या मालमत्तेची हानी झाल्यास त्याची खरेदीदाराने स्वखर्चाने योग्य पध्दतीने भरपाई करावयाची आहे.

2.14 निविदाकारांनी निविदा प्रक्रियेत कोणताही राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा निविदादाराची निविदा रद्द करण्यात येईल. तसेच सदर आस्थापनेस काळया यादीत समावेश करण्यात येईल.

2.15 भंगार साहित्यात कचरा असल्यास शासन निर्देशानुसार अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

2.16 काही प्रशासकिय अडचणींमुळे दरपत्रक/निवीदा विहित दिनांकास उघडता न आल्यास नजिकच्या पुढील दिनांकास उघडण्यात येतील.

2.17 कोणतीही निविदा राखून ठेवण्याचा, विक्री रद्द करण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखांना राहील.

2.18 कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवलेला आहे.

2.19 अ.क्र. 2.7 नुसार नियमबाहय वर्तन करणाऱ्या तसेच खरेदीचा दर सर्वात जास्त असणाऱ्या खरेदीदाराने खरेदीची रक्कम विहित कालावधीत संस्थेस अदा न केल्यास किंवा साहित्य संस्थेतून विहित कालावधीमध्ये घेऊन न गेल्यास अशा खरेदीदारास/निवीदादारास काळया यादीत टाकण्याकरिता शासनास प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

2.20 भगवान परशुराम शासकिय औ.प्र. संस्था, चिपळूण जिल्हा रत्नागिरी येथील कर्मचारी व त्यांचे नातेवाईक हे निवीदा सादर करण्यास अपात्र राहतील.

Scanned with OKEN Scanner

2.21 हत्यारे, अवजारे, उपकरणे, यंत्रसामुग्री, संगणक व आय.टी. उपकरणे व इतर साधन सामुग्री साहित्याची खरेदी किंमत विहित नुमना क्रमांक अ व साहित्य विक्री कार्यवाहीबाबतचे वेळापत्रक सोबत जोडण्यात येत आहे. तसेच सदर परिपत्रक संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सोबत : वरिलप्रमाणे

(पी.एम. शेटये)
प्राचार्य
भगवान परशुराम शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था
चिपळूण, जिल्हा रत्नागिरी

प्रत,

01 - मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रा.का. मुंबई-81 यांना माहितीसाठी सविनय सादर.
02 - मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, रत्नागिरी यांना माहितीसाठी सविनय सादर.
03 - मा. जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी, जिल्हा माहिती व जनसंपर्क कार्यालय, रत्नागिरी यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकास जिल्हा पातळीवरील (रत्नागिरी जिल्हा) अग्रगण्य मराठी वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.
04 - मा. तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, चिपळूण जिल्हा रत्नागिरी
05 - मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिपळूण, जिल्हा रत्नागिरी
06 - श्री. वानखेडे व्ही.एम. उपप्राचार्य, भगवान परशुराम शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिपळूण जिल्हा रत्नागिरी
07 - मा. मुख्याधिकारी, नगरपालिका, चिपळूण, जिल्हा रत्नागिरी
2/- यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर सदर परिपत्रकास प्रसिध्दी देण्यात यावी
08 - मा. तलाठी, तलाठी कार्यालय, कान्हे, ता. चिपळूण जिल्हा रत्नागिरी
2/- यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर सदर परिपत्रकास प्रसिध्दी देण्यात यावी
09 - श्री. कडवईकर ए.पी. शिल्पनिदेशक संधाता यांना संस्थेच्या वेबपेजवर प्रसिध्दीसाठी
10 - मा. प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मंडणगड/दापोली/गुहागर/खेड/संगमेश्वर/रत्नागिरी/ रत्नागिरी (मुलींची) लांजा/राजापूर/यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेच्या सूचना फलकावर सदर परिपत्रकास प्रसिध्दी देण्यात यावी.
11 - भगवान परशुराम शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिपळूण जिल्हा रत्नागिरी यांचे सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी.

ग्राम महसूल अधिकारी कान्हे
ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
27-1-2025

पत्र मिळाले
आवक लिपीक दि. 27 JAN 2025
चिपळूण नगर परिषद चिपळूण

20/1/2024
बारनिशी कारकून
पंचायत समिती, चिपळूण

27-01-25
महसूल सहाय्यक
तहसिलदार कार्यालय चिपळूण

## हत्यारे, अवजारे, उपस्कर व इतर साधन सामुग्री साहित्याची निविदा पध्दतीने एकत्रित लॉट पध्दतीने विक्री करण्यासंदर्भातील वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशिल | कालावधी | अंतिम दिनांक व वेळ |
| --- | --- | --- | --- |
| 01 | दोन सिलंबद लिफाफ्यातील निविदा स्विकारणे. | दिनांक 27.01.2025 ते दिनांक 07/02/2025 या कालावधीत दुपारी 3.00 ते सायंकाळी 5.00 पर्यंत (सार्वजनिक सुट्टी व शनिवार वगळून) | दिनांक 07/02/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 02 | संस्थेतील साहित्याच्या लॉट ची पहाणी करणे. | दिनांक 27.01.2025 ते दिनांक 05/02/2025 या कालावधीत दुपारी 3.00 ते सायंकाळी 5.00 (सार्वजनिक सुट्टी व शनिवार वगळून) | दिनांक 05/02/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 03 | निविदेची सिलंबद लिफाफे उघडणे | ------ | दिनांक 11.02.2025 वेळ सकाळी 11.00 वाजता |
| 04 | सर्वात जास्त दर देणाऱ्या निविदादारास/खरेदीदाराने खरेदीची रक्कम अदा करणे. | दिनांक 13.02.2025 ते दिनांक 15/02/2025 | दिनांक 15.02.2025 सायंकाळी 5.00 वाजता वाजेपर्यंत |
| 05 | साहित्य ताब्यात घेणे | दिनांक 17.02.2025 ( सार्वजनिक सुट्टी व शनिवार वगळून) | दिनांक 17.02.2025 सकाळी 11.00 सकाळी |

Scanned with OKEN Scanner

# निवीदा नमुना

दिनांक :-

प्रति,

मा. प्राचार्य,
भगवान परशुराम शासकियऔद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिपळूण,
जिल्हा रत्नागिरी,

**विषय :- निर्लेखित हत्यारे, यंत्रसामुग्री, उपकरणे या करीता निवीदा.**

**संदर्भ :- आपले पत्र क्र. ---**

महोदय,

वरील संदर्भाकीत विषयास अनुसरुन आपल्याकडील हत्यारे, यंत्रसामुग्री व उपकरणे यांचे अवलोकन करुन मी खालील प्रमाणे निवीदा सादर करीता आहे.

| अ.क्र. | हत्यारे, यंत्रसामुग्री व अवजारे यांचे वर्णन (लॉट) | लॉट पध्दतीत नमुद एकूण रक्कम अंकी व अक्षरी |
|---|---|---|
| | | |

निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. मी निविदेस पुरक खालील कागदपत्रे स्वतंत्र लखोटयात सादर करत आहे.

01. आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स
02. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स
03. पॅनकार्ड झेरॉक्स
04. काळया यादीत नसल्याचे प्रमाणपत्र

निविदेच्या सर्व अटी मला मान्य असून त्यानुसार मी ही निविदा सादर करीता आहे.

आपला विश्वासू

स्वाक्षरी

1. आस्थापनाधारकाचे पूर्ण नाव --
2. आस्थापनेचे नाव --
3. पूर्ण पत्ता --
4. मोबाईल क्रमांक --
5. ई-मेल आयडी --

Scanned with OKEN Scanner